
REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2018

# राजा राममोहन रॉय यांचे राजकीय व आर्थिक विचार: एक विवेचन

प्रा. केंद्रे सुमन लक्ष्मण
सहाय्यक पाध्यापक
इतिहास विभाग , लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर

## प्रस्तावना :



आधुनिक भारत आणि भारतीय प्रबोधनाचे जनक संबोधल्या गेलेल्या राजा राममोहन रॉय यांनी भारतीय समाज, धर्म यांचे मूलगामी चिंतन करून पुढील सामाजिक आणि धार्मिक सुधारणा चळवळींना दिली याद्दष्टीने त्यांना सुधारकांचे अध्यात्मिक पिता तथा नवयुगाचे अग्रदूत म्हंटले गेले आहे. रॉय यांच्या सामाजिक आणि धार्मिक चिंतनाबरोबरच त्यांचे राजकीय व आर्थिक विवेचन, वेळोवेळी त्यांनी मांडलेल्या भूमिका राज्यसंस्थेला पथदर्शी होत्या. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात त्यांच्या राजकीय व आर्थिक विचारांचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

## राजकीय विचार

राजा राममोहन रॉय ब्रिटिश राज्याला परमेश्वरी प्रसाद संबोधतात. यापाठीमागे त्यांची भूमिका होती की, ब्रिटीश लोक १७ व्या १८ व्या शतकात युरोपात झालेली भौतिक व सामाजिक शास्त्रांतील प्रगती तथा मानवसुधारणेतही आघाडीवर होते. त्यामुळे त्यांच्या अंमलात ते भारायीयांना विविध सुधारणाद्वारा आपल्या पदवीपर्यंत पोहचवीतील अशी आशा आशा होती. त्यामुळे ब्रिटीश राज्यकर्त्यांच्या आगमनाबद्दल ते आनद व्यक्त करतात.रॉय यांनी ब्रिटीशांचे लक्ष राजकीय सुधारणेकडे वेधल्याचे दिसून येते. ते स्वातंत्र्य आणि लोकसत्तेचे समर्थक होते. त्यांची अशी धारणा होती की, भारतीय शतकभरात ब्रिटिशांच्या सहवासाने सुधारून प्रतिकारास सज्ज होतील. आणि भारताची विशालता,सुदूरता यामुळे इंग्लडला भारताचे पारिपत्य करता येणार नाही. त्यामुळे इंग्लडने भारताला कॅनडासारखा जवळचा मित्र बनवावा. स्वातंत्र्यानंतरही दोनही देशांचे संबंध मित्रत्वाचेठेवताना; व्यापारी, वैचारिक व सांस्कृतिक विनिमय सतत चालावाअशी अंतिम मनीषा होती.रॉय यांनी उच्च सेवांचे भारतीयीकरण करण्याची मागणी केली. इंग्लंडमधील त्याचा सचिव आर्नोट ने लिहिले आहे की, ‘राजा राम मोहन रॉय यांच्या विचाराने भारत ४०वर्षांच्या आत स्वतंत्र होईल. या दरम्यान ब्रिटिश शासनाच्या अधीन राहून भारत विश्वातील स्वतंत्र देशाची स्थिती प्राप्त करेल’.

रॉय यांचे राजकीय विचार उपयुक्ततावादी विचारवंत बेंथम याच्या विचारासारखे असल्याचे दिसून येते. राजकीय आंदोलने ही राज्यसंस्थेच्या चुका दूर करण्याचे माध्यम म्हणून त्यांची आंदोलनांवर विश्वास होता.या प्रकारचे पहिले आंदोलन

त्यांनी सन. १८२३ मधील एडम्सच्या वृत्तपत्र अध्यादेशाने वृत्तपत्रीय स्वातंत्र्यावर लादल्या गेलेल्या निर्बंधाविरुद्ध केले. भारतीय राष्ट्रवादी चळवळींत सनदशीर मार्गाने प्रतिकार करून शासनाच्या धोरणांविरुद्ध दाद मागण्याचे हे पहिलेच आंदोलन असल्याचे दिसून येथे. या आंदोलनात त्यांनी एडम्सच्या अध्यादेशाविरुद्ध निवेदन तयार केले. ज्यावर बंगालमधील अनेक प्रतिष्ठित मंडळींच्या सह्या होत्या. या निवेदनात ते हा प्रतिकार राजसत्तेविरुद्ध नसून राजसत्तेच्या दुरुपयोगाविरुद्ध असल्याचे नमूद करतात. रॉय यांच्या मते, विचारस्वातंत्र्य, प्रचारस्वातंत्र्य आणि धर्मस्वातंत्र्ययातच भावी उत्कर्षाचे बीज आहेत. त्यामुळे ब्रिटिशांच्या मुद्रणस्वातंत्र्यावर गदा घालून नागरिक स्वातंत्र्य नष्ट करण्याच्या कृतीवर त्यांनी संताप व्यक्त केला. पण या निवेदनाचा कोणताही परिमाण न झाल्याने निषेधाचा मार्ग म्हणून वृत्तपत्रच बंद केले. पुढे रॉय यांनी सन. १८२७ मध्ये ज्युरी ऍक्टनुसार धार्मिक आधारावर होणाऱ्या हिंदूमुस्लिमांत भेदभावास विरोध करताना ब्रिटिश संसदेला निवेदनपत्र दिले. सन. १८३० मध्ये माफीची भूमी किंवा दान स्वरूप दिलेली जमीन परत घेण्याच्या सरकारच्या विरोधात आवाज उठविला. इंग्लंडमधील वास्तव्यात असताना सरकारला निवेदन देऊन लोकांच्या समस्या मांडल्या आणि कंपनी प्रशासनातील दोषदूर करण्यासंबंधीच्या सूचना दिल्या.सर्वप्रथम भारतीयांना संविधानिक आंदोलनाचा मार्ग सांगितला ज्याचे पालन पुढे भारतीय नेत्यांनी केले.

उदारमतवादी आणि प्रगतशील असलेल्या ब्रिटिश राजवटीअंतर्गत भारताची नैतिक उन्नती होऊन तो स्वातंत्र्य मिळविण्याच्या पात्रतेचा बनेल. मात्रकंपनीचच्या शासनाला विवेकपूर्ण सिद्धांताच्या आधार असावा. कायद्याचे राज्य सर्वोपरी असावे. नागरिकांच्याजीवन आणि संपत्तीचे अधिकार, विचार अभिव्यक्तीची, धार्मिक स्वातंत्र्याचा समावेश त्यांना अपेक्षित होता.

रॉय यांचा सत्ता विभाजनाच्या सिद्धांतावर विश्वास असल्याने कार्यपालिका आणि न्यायपालिका हे एकमेकांपासून वेगळे असावेत. कायदे मंडळाच्या संदर्भातील त्यांचे विचार हे कालानुरूप आणि वस्तुस्थितीला आधारभूत होते. भारतीयांवर राज्य चालवताना ब्रिटिश संसदेने कायदे पारित करावेत मात्र हे करताना भारतीय रीतीरिवाज अथवा परिस्थितीच्या प्रतिकूल नसल्याची काळजी घ्यावी. भारतीयांच्या निर्वाचित होण्याची संभावना नसल्याकारणाने भारतात खर्या अर्थाने प्रातिनिधिक संस्था निर्माण होणार नाही; पर्यायाने अशा विधिमंडळात सरकार नियुक्त सदस्यांचे बहुमत होऊन कायदे निर्मितीचे कार्य व्यापारी आणि नफा कमावणाऱ्या कंपनीच्या हातात जाईल. आणि म्हणून भारतीय कायदे नियंत्रित परिस्थितीत ब्रिटीश पार्लमेंटमध्ये पारित व्हावेत. मात्र कार्यपालिकेचे हस्तांतर कंपनीकडून ब्रिटिश राज मुकुटाच्या हातात जाऊ नये कारण वाहतुकीच्या साधनांच्या अभावी इंग्लंडहुन भारतावर प्रत्यक्ष शासन करणे अवघड होईल. तथापि कंपनी अधिकाऱ्यांच्या अन्यायपूर्ण कार्याच्या विरुद्ध काही संरक्षण असावे, तसेच त्यांच्या कायदेशीर जबाबदारीत्वाचे परीक्षण न्यायाधीशाद्वारे व्हावेअशी त्यांची भूमिका होती.

रॉय यांनी न्यायव्यवस्थेसंदर्भात मांडलेले विचारही मौलिक आहेत. कंपनीचे न्याय प्रशासन भ्रष्ट आणि भारतीय परंपरांच्या प्रतिकूल असल्याकारणाने रॉय यांनी न्यायव्यवस्थेत सुधारणा करण्यासाठीचे अनेक उपाय मांडले. त्यात लोकांची भाषा जाणणाऱ्या योग्य आणि सक्षम न्यायाधीशांची नियुक्ती, उच्च पदांवर भारतीयांची नियुक्ती, ज्युरी प्रथा सुरु करावी,पंचायतींचे पुनरुज्जीवन, भारतीय आणियुरोपीय यांच्यात न्यायिक समानता,लोकांसाठी खुले असलेलेन्यायालयीन कामकाज यांचा समावेश होता.एकंदरीत रॉय यांचे राज्यासंबंधीचे विचार अनुयायवादी असल्याचे दिसून येते.

रॉय यांचा राजकीय दृष्टिकोन आंतरराष्ट्रीय असून, ते आंतरराष्ट्रीयतेचे अनन्य पुजारी होते. त्यांचा आंतरराष्ट्रीयता आणि विभिन्न राष्ट्रांच्या सहकार्यावर विश्वासहोता. आंतरराष्ट्रीय स्वातंत्र्यता, समानता आणि न्यायाचे पुरस्कार करताना संपूर्ण मानवजातीच्या स्वातंत्र्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे दक्षिण अमेरिका खंडातील स्पॅनिश वासाहतिक साम्राज्याविरुद्ध स्वातंत्र्यलढा, स्पेन, अमेरिका आणि नेपल्समधील स्वातंत्र्याच्या चळवळी, युनायटेड किंग्डममधील कॅथलिकांचे स्वातंत्र्य, स्पेनमधील राजेशाहीविरुद्ध असलेल्या उदारमतवाद्यांचा संघर्ष यासारख्या अनेक मुक्ती लढ्यांना त्यांनी साथ दिली. आयर्लंडमधील जमीनदारांद्वारा तेथील शेतकऱ्यांवर होणाऱ्या अत्याचाराची निंदा करताना यासंदर्भातील आलेले सुधारणा विधेयक ब्रिटिश संसदेत मंजूर न झाल्यास इंग्लड सोडूनजाण्याची घोषणा त्यांनी केली होती. त्यांनी सन. १८३० मधील फ्रान्सची जुलै क्रांती आणि सन. १८३२ मधील इंग्लंडच्या सुधारणा विधेयकाचे स्वागत केले. फ्रांसच्या परराष्ट्र मंत्रालयाला लिहिलेल्या पत्रात'संपूर्ण मानव जाती एक मोठे परिवार असून ज्याचेअनेक राष्ट्र आणि जमाती या शाखा आहेत.' असे म्हणतात. येथेच आंतरराष्ट्रीय संघटनेच्या स्थापनेसंदर्भात सूचना करताना आंतरराष्ट्रीय विवादांची सोडवणूक युद्ध न करता शांततेच्या मार्गाने व्हायला हवी. यासाठी संबंधित देशांच्या एके-एक सदस्याला घेऊन आंतरराष्ट्रीयकॉंग्रेस बनविण्याची योजना त्यांनी मांडली होती.

याच पाश्वभूमीवर सी.ए.बेली यांनी रॉय यांच्या संदर्भात केलेले 'रॉय हे पहिले हिंदुस्थानीं आहेत, ज्यांनी हिंदुस्थानातील स्वातंत्र्याचा विचार हा मानवतेच्या अस्मितांच्या, व्यापक जिज्ञासूपणाचा अविभाज्य घटक आहे असे मानून प्रतिनिधित्व केले.' हे विधान त्यांच्या भूमिका आणि विचारांची महत्ता लक्षात आणून देते.

## आर्थिक विचार

रॉय यांनी ब्रिटीश अर्थकारणाचे मूलगामी चिंतन केले होते. ब्रिटीश राजसत्तेतील आर्थिक हितसंबंधातून नवीन मध्यम व्यापारी व सुशिक्षित अधिकारी-वर्ग समाजात पुढे येत असून या वर्गातूनचलोकसत्तेचा लढा उभा राहील. ते मुक्त व्यापार आणि खासगी संपत्तीचे समर्थक होते. ब्रिटिश मालाची, भांडवलाच्या होणाऱ्या मोठ्या आयातीत देशाचे हितच असल्याने इंग्लड व भारतातील व्यापार अप्रतिबंध व आयात-निर्यात खुली असावी. मात्र भारतीय वस्तूंवरील निर्यात शुल्क कमी करावे अशी त्यांची मागणी होती.

ब्रिटिश मळेवाल्यांच्या आणि भांडवलदारांच्या भारतातील अस्तित्व कंपनी, कंपनीचे अधिकारी, तसेच भारतीय जमीनदारवर्ग यांना नको होते. मात्र रॉय याबाबतीत अनुकूल मत मांडताना संवाद कौमुदीच्या २६फेब्रुवारी, १८२८ मधील लेखातयामुळे कनिष्ठ वर्ग व मध्यमवर्गाची स्थिती अधिक सुधारेल. आणि याची चीड जमीनदारवर्गाला असून कनिष्ठ वर्ग व मध्यमवर्गाच्या डोक्यावर नाचावे अशी त्यांची इच्छा असल्याचे ते लिहितात.जमिनीवरील अधिकार हा राज्याकडे नव्हे तर ती जमीन ज्याच्याकडे आहे त्याच्याकडेच असावा या मताचे ते होते. शेतसारा निश्चिती व वसुलीत जमीनदारांसारखे शेतकऱ्यांच्या जमीन महसुलात स्थिरता असावी असे मांडतानाच कर मुक्त जमिनीवर पुन्हा कर लादण्याच्या शासनाच्या प्रयत्नाचा ते विरोध करताना दिसतात.

भारतातील संपत्तीच्या होणाऱ्या दोहनावर त्यांचे विचार पथदर्शी होते. त्यांनी ईस्ट इंडिया कंपनीच्या विशेषाधिकारांना समाप्त करण्यासाठी सरकारला निवेदन दिले. कंपनीचा सैनिकी खर्च आणि गृह खर्चयात कपात करून सार्वजनिक खर्च कमी कारवाई. आणि राज्याने सामाजिक कल्याणकारी कार्याची अंमलबजावणी करावी असा त्यांचा आग्रह होता.

थोडक्यात रॉय यांच्या आर्थिक चिंतनाचा केंद्रबिंदू हा शेतकरी, शेतमजूर होता. या वर्गाच्या समस्यांना त्यांनी वाचा फोडली. तर दुसरीकडे कंपनीच्या भारतातील आर्थिक धोरणासंदर्भात काही महत्वपूर्ण सूचना करताना त्यात भारतीयांचे हित व कल्याण जोपासण्याची भूमिका घेतली.

## संदर्भ :

१. ग्रोवर बी. एल. व बेल्हेकर एन. के., आधुनिक भारताचा इतिहास, एस. चंद आणि कंपनी, नवी दिल्ली, २०१३
२. चंद्र बिपीन, आधुनिक भारत का इतिहास, ओरीयंट ब्लैकस्वान, नई दिल्ली, २०१५
३. चंद्र बिपीन (संपा.), भारत का स्वतंत्रता संघर्ष, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली, २०१५
४. ताराचंद, भारतीय स्वतंत्रता आंदोलन का इतिहास, खंड २, प्रकाशन विभाग, सूचना और प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, नई दिल्ली, २००७
५. देसाई ए. आर., भारतीय राष्ट्रवाद की सामाजिक पृष्ठभूमी, मॅकमिलन पब्लिशर्स, दिल्ली, २०१२
६. बंद्योपाध्याय शेखर, पलासी से विभाजन तक और उसके बाद, ओरीयंट ब्लैकस्वान, नई दिल्ली, २०१९
७. राय कोलेश्वर, आधुनिक भारत (१७५७ ते १९५०), किताब महाल, इलाहाबाद, १९८८
८. वैद्य सुमन व कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास (१७५७ ते १८५७), श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१६
९. वैद्य सुमन व कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास (१८५७ ते १९२०), श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१७
१०. सरकार सुमित, आधुनिक भारत, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली, २०१८
११. सिंह अभय (संपा.), भारत में राष्ट्रवाद, ओरीयंट ब्लैकस्वान, नई दिल्ली, २०१९